# लोकमत

नाशिक, सोमवार, दि. २४ फेब्रुवारी २०२०




रिफ्रेशकॉन परिषदेच्या शुभारंभप्रसंगी डॉ. भरत वटवानी आणि डॉ. हरीश शेट्टी. समवेत आयएमए अध्यक्ष डॉ. प्रशांत देवरे, सचिव डॉ. विशाल गुंजाळ, डॉ. किरण शिंदे, डॉ. हेमंत सोननीस, डॉ. विशाल पवार.

# सामाजिक स्वास्थ्यासाठी समाजाने पुढे यावे

## भरत वटवानी : आयएमएच्या रिफ्रेशकॉनचा शुभारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** समाजात आणि कुटुंबांमधील एकमेकांशी संवाद तुटत चालला असून, भविष्यासाठीचा हा खूप मोठा धोका आहे. त्यामुळे सामाजिक संवाद आणि स्वास्थ्य सुधारणे ही काळाची नितांत गरज असून, त्यासाठी डॉक्टरांसह समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे मत मॅगसेसे पुरस्कार विजेते मानसोपचार तज्ज्ञ डॉ. भरत वटवानी यांनी केले आहे.

इंडियन मेडिकल असोसिएशनच्या (आयएमए) सभागृहात रविवारी रिफ्रेशकॉन या डॉक्टरांसाठीच्या दोन दिवसाच्या मार्गदर्शन सत्राचा शुभारंभ त्यांच्या उपस्थितीत पार पडला. त्यावेळी डॉ. वटवानी समाजातील मनोरुग्णांचे वाढते प्रमाण ही अत्यंत चिंतनीय बाब असून, त्या तुलनेत मानसोपचारतज्ज्ञांची संख्या नगण्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

मात्र, तरीदेखील समाजातील प्रत्येक घटकाने दक्ष राहून मानसोपचाराची गरज भासणाऱ्या प्रत्येकाला संबंधित डॉक्टरांपर्यंत, त्यांच्यासाठी कार्य करणाऱ्या संस्थेपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले तरी त्यातून अनेकांच्या समस्या कमी होऊ शकतील. अवघड आहे, मात्र अशक्य नसल्याचा विश्वास डॉ. वटवानी यांनी व्यक्त केला.

यावेळी व्यासपीठावर आयएमएचे अध्यक्ष डॉ. प्रशांत देवरे, सचिव डॉ. विशाल गुंजाळ, डॉ. हेमंत सोननीस, डॉ. किरण शिंदे, डॉ. विशाल पवार, डॉ. वैभव पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### बालकांना खंबीर बनविण्याची गरज

◆ मानसोपचारतज्ज्ञ डॉ. हरीश शेट्टी यांनी समाजातील बालकांना खंबीर बनवण्यासाठी पालकांनी त्यांना अतिलाड, अतिसुरक्षित कोशातून बाहेर काढणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच आवश्यकतेनुसार स्पष्ट शब्दात तुमच्या राग, लोभ, प्रेमाच्या भावना व्यक्त करा आणि तितक्याच खुलेपणाने मुलांनादेखील त्या मांडू देण्यास सांगितले. कोणतीही गोष्ट मनात धरुन ठेवली की ती कुजून त्याची विकृती वेगळ्या स्वरुपात बाहेर पडते. त्यामुळे प्रत्येकाला मोकळे होण्याची संधी दिल्यास मानसिक आजारांचे प्रमाण कमी होऊ शकेल, असेही त्यांनी नमूद केले.